
मराठी

# बालभारती

इयत्ता चौथी




शासन मंजुरी क्रमांक : प्राशिसं/२०१४-१५/६७११/मंजुरी/ड-५०५/२४४२ दिनांक : २४/४/२०१४

## मराठी

# बालभारती

## इयत्ता चौथी



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

प्रथमावृत्ती : २०१४
तिसरे पुनर्मुद्रण : २०१७

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा समिती :**

प्रा. रा. रं. बोराडे, अध्यक्ष
इरगोंडा पाटील, सदस्य
फादर फ्रान्सिस दिब्रिटो, सदस्य
वाहरू सोनवणे, सदस्य
प्रा. प्रज्ञा दया पवार, सदस्य
डॉ. सुभाष सावरकर, सदस्य
किशोर दरक, सदस्य
श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा समिती – कार्यगट सदस्य**

हरी गंगाधर नारलावार
प्रा. सर्जेराव रणखांब
श्रीमती रेणू दांडेकर
प्रा. जयवंत पाटील
डॉ. रोहिणी गायकवाड
डॉ. मंदा नांदूरकर
प्रा. डॉ. सिसिलिया कार्व्हालो
प्रा. डॉ. सुनीता सुळेकर
प्राचार्य डॉ. गोविंद गायकी
डॉ. संध्या पवार
श्रीकांत चौगुले
पद्माकर कुलकर्णी
शिवा कांबळे
नीलेश निमकर
एकनाथ आव्हाड
अतुल कुलकर्णी
वेच्या रूध्या गावित

**संयोजन** : श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख
प्र. विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : विजयकुमार शिंदे

**मुखपृष्ठ** : सुहास जगताप

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
सचिन मेहता, निर्मिती अधिकारी
नितीन वाणी, निर्मिती सहायक

**कागद** : ७० जी.एस.एम. मॅपलिथो

**मुद्रणादेश** :

**मुद्रक** :

**प्रकाशक**

विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ॥

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९' आणि 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-२००५' डोळ्यांसमोर ठेवून राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम-२०१२' तयार करण्यात आला. या शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित मराठी विषयाची इयत्ता पहिली ते आठवीची नवीन बालभारती माला २०१३-१४ या शालेय वर्षापासून टप्प्याटप्प्याने पाठ्यपुस्तक मंडळ प्रकाशित करत आहे. या मालेतील इयत्ता चौथीचे हे पुस्तक आपल्या हाती देताना आनंद वाटतो.

घर व परिसरातून अनौपचारिकपणे मुलांची शब्दसंपत्ती विकसित झालेली आहे. इयत्ता चौथीमध्ये त्याला श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन ही भाषिक कौशल्ये अधिक चांगल्या प्रकारे अवगत करता यावीत, अशी अपेक्षा आहे. या अपेक्षेची पूर्तता करण्यासाठी सुलभ व रंजक असे पाठ, कविता आणि पूरक वाचनासाठी विविध साहित्य प्रकारांची निवड केलेली आहे. निवड करताना मुलांचे भावविश्व, अनुभव, परिसरातील घटना व प्रसंग यांचा विचार केला आहे. गाभाघटक, मूल्ये, जीवनकौशल्ये यांचा अंतर्भाव पाठांतील आशयात तसेच स्वाध्याय, भाषिक कृती, उपक्रम व प्रकल्पांत केलेला आहे.

विविध भाषिक कृतींच्या माध्यमातून शिकताना विद्यार्थी ज्ञानाची निर्मिती सहजतेने करू शकतील व यातूनच त्यांचा भाषिक विकासही साधता येईल. त्याबरोबरच पाठांच्या आशयाचा स्वतःशी व परिसराशी संबंध जोडणे, भाषाविकास साधणे यांसाठी नावीन्यपूर्ण स्वाध्यायांचा समावेश केला आहे. लेखन व अभिव्यक्ती विकासासाठी विद्यार्थ्यांना स्वतःची कल्पकता वापरून लेखन करता यावे, यासाठी चित्रमालिकेवरून तसेच मुद्द्यांवरून गोष्ट तयार करणे यांसारख्या अध्ययन-अनुभवांची योजना केलेली आहे. तसेच मनोरंजनासाठी विनोद, कोडी यांचाही समावेश केला आहे.

मराठी भाषा समिती, कार्यगट सदस्य आणि चित्रकार यांच्या आस्थापूर्वक परिश्रमांतून हे पुस्तक तयार झाले आहे. हे पुस्तक जास्तीत जास्त निर्दोष आणि दर्जेदार व्हावे, यासाठी राज्याच्या विविध भागांतील शिक्षक, भाषातज्ज्ञ व शिक्षणतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले आहे. त्यांच्या सूचना व अभिप्रायांचा विचार करून मराठी भाषा समितीने पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

मराठी भाषा समिती व कार्यगट सदस्य, संबंधित समीक्षक, तज्ज्ञ, चित्रकार या सर्वांचे मंडळ मनःपूर्वक आभारी आहे. विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

**(चं. रा. बोरकर)**
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक** : ३१ मार्च २०१४
१० चैत्र, शके १९३६

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | धरतीची आम्ही लेकरं (कविता) | द. ना. गव्हाणकर | १ |
| २. | बोलणारी नदी | - | २ |
| | • आम्ही संवाद करतो | - | ७ |
| ३. | आम्हांलाही हवाय मोबाइल ! (नाट्यछटा) | सूर्यकांत सराफ | ८ |
| ४. | या भारतात... (कविता) | राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज | ९ |
| ५. | मला शिकायचंय ! | आबा गोविंदा महाजन | १० |
| | • आम्ही कथा लिहितो-१ | - | १४ |
| ६. | मायेची पाखर | पां. चिं. पाटील | १५ |
| ७. | धूळपेरणी (कविता) | अशोक कौतिक कोळी | १९ |
| ८. | गुणग्राहक राजा | बाबा भांड | २२ |
| | • आम्ही आमचे अनुभव लिहितो | - | २६ |
| ९. | ईदगाह | प्रेमचंद<br>(अनुवाद - संजीवनी खेर) | २७ |
| | • आम्ही सहलीला जातो | - | ३१ |
| १०. | धाडसी हाली (मुलाखत) | - | ३३ |
| ११. | नाखवादादा, नाखवादादा... (कविता) | वसुधा पाटील | ३७ |
| | • आम्ही खेळ खेळतो | - | ३९ |
| १२. | वाटाड्या | शैलजा काळे | ४० |
| १३. | चवदार तळ्याचे पाणी (कविता) | अनुराधा साळवेकर | ४६ |
| १४. | मिठाचा शोध | अंजली अत्रे | ४९ |
| | • निमंत्रण पत्रिका | - | ५२ |
| १५. | आनंदाचं झाड | लीला शिंदे | ५४ |

| अ. क्र. | पाठाचे नाव | लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १६. | झुळूक मी व्हावे (कविता) | दा. अ. कारे | ५७ |
| १७. | म्हणींच्या गमती | – | ५९ |
| | • आम्ही कथा लिहितो-२ | – | ६२ |
| | • आम्ही लेखन करतो | – | ६४ |
| १८. | जननायक बिरसा मुंडा | – | ६५ |
| १९. | हें कोण गे आई ? (कविता) | भा. रा. तांबे | ६७ |
| | • आम्ही सूचना फलक वाचतो | – | ६९ |
| २०. | कोलाज | – | ७० |
| २१. | आभाळमाया (कविता) | विलास सिंदगीकर | ७३ |
| | • आम्ही चित्रवर्णन करतो | – | ७५ |
| २२. | होय, मीसुद्धा ! | राजीव तांबे | ७६ |
| २३. | मन्हा खान्देस्नी माटी (कविता) | शकुंतला भा. पाटील | ८० |
| | • आमचे गाव (नकाशा) | – | ८२ |
| | • आम्ही असेही बोलतो | – | ८३ |
| २४. | थोर हुतात्मे | – | ८४ |
| २५. | संतवाणी | संत तुकाराम | ८८ |
| | | संत चोखामेळा | |
| | | संत शेख महंमद | |

# १. धरतीची आम्ही लेकरं

- **ऐका. म्हणा. वाचा.**



धरतीची आम्ही लेकरं । भाग्यवान ।
धरतीची आम्ही लेकरं ।। ध्रु. ।।

शेतावर जाऊया । सांगाती गाऊया ।
रानीवनी गाती जशी रानपाखरं ।। १ ।।

मेहनत जिमनीवरी । केली वरीसभरी ।
आज आलं फळ त्याचं डुले शिवार ।। २ ।।

शाळु, जुंधळा मोती । चमचम चमकत्याती ।
मोत्यांची सालभरी खाऊ भाकर ।। ३ ।।

स्थापू समानता, पोलादी ऐक्यता ।
नाही धनी येथ कुणी, नाही चाकर ।। ४ ।।

धरतीची आम्ही लेकरं । भाग्यवान ।
धरतीची आम्ही लेकरं ।।


**– द. ना. गव्हाणकर**



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावी.

# २. बोलणारी नदी

एक होती मुलगी. तिचे नाव लीला. होती ती चौथीत अन् होती भारी खोडकर. लोकांना त्रास द्यावा असे तिला नाही वाटायचे, पण तिला खोड्या काढण्याची भारी हौस. स्वतःच्या मनात येईल ते करायची तिला इच्छा असायची. त्यासाठी मजेशीर युक्त्या शोधायची. तिचे घर होते गावाच्या एका टोकाला. तिच्या घराच्या मागील वावराच्या बाजूला थोडेसे चालत गेले की नदी होती.



एक दिवस लीलाला बर्फाचा गोळा खावासा वाटला. आई म्हणाली, ''नको खाऊ.'' ताई म्हणाली, ''नको खाऊ.'' माई म्हणजे तिची आजी म्हणाली,

*'' लीला गं लीला,*
*नको खाऊ गोळा,*
*दुखेल तुझा गळा.*
*सगळं पाणी होईल,*
*नाकात गोळा !''*


आता काय करावे बरे ? लीला विचार करू लागली. तिला एक युक्ती सुचली. ती नदीकडे गेली. नदीला म्हणाली, ''नदी गं नदी !'' पण नदी बोलणार कशी ? मग ती स्वतःच म्हणाली, ''बोल गं लीला.'' मग लीला म्हणाली, ''नदी गं नदी, लीलाला खायचाय बर्फाचा गोळा; पण माई म्हणाली, दुखेल गळा. खाऊ का नको ?'' पण नदी कशी बोलणार ? परत लीलाच म्हणाली, ''मग खा की. पळत जा अन् पटकन खा.'' लीला म्हणाली, ''अगं, पण तुझं कसं ऐकू ? ताई म्हणाली, नको खाऊ. आई म्हणाली, नको खाऊ. माई म्हणाली, नको खाऊ.'' पण नदी कशी बोलणार ? परत लीलाच म्हणाली, 'अगं, ताईपेक्षा मोठी आई. आईपेक्षा मोठी माई. पण माईपेक्षाही मोठी मी – नदीबाई. माझं ऐक.'' ''बरोब्बर !''

लीला पळत बर्फवाल्याकडे गेली. गोळा खाऊन परत आली. तिला बोलणारी नदी खूप आवडली. ताई, आई, माई यांच्यापेक्षा मोठी नदीबाई. तिची परवानगी मिळाली, की आपण हवे ते करू शकतो, असे तिला वाटले.

एक दिवस लीलाला आला कंटाळा. तिला वाटले बुडवावी शाळा. तिने ताईला विचारले. ताई म्हणाली, ''नको बुडवू शाळा.'' आई म्हणाली, ''नको बुडवू.''

माई म्हणाली,

*''लीला गं लीला,*
*आला जरी कंटाळा,*
*बुडवू नकोस शाळा.*
*शिकूनसवरून होशील*
*सुखी माझ्या बाळा.''*



लीला चिडली. कुणीच कसे शाळा बुडवू देत नाही ? 'शाळेला जाते', असे सांगून ती नदीकडे गेली. नदीला म्हणाली, ''नदी गं नदी, लीलाला आलाय कंटाळा, बुडवावी वाटतेय शाळा. काय करू?'' पण नदी कशी बोलणार ? मग लीलाच बोलली, ''आलाय जर कंटाळा, तर बुडव बिनधास्त शाळा.''

ताई, आई, माईपेक्षा मोठ्या नदीबाईने परवानगी दिली म्हटल्यावर लीला शाळेला गेली नाही. दिवसभर नदीकाठी, वावरात खेळत राहिली. संध्याकाळी घरी आली. तिची ताई तिच्याच शाळेत सातवीत शिकत होती. लीलाने शाळा बुडवल्याचे तिला कळले होते. तिने आई अन् माईलापण सांगितले होते. त्या तिघींना लीलाची 'बोलणारी नदी'पण माहीत झाली होती. त्या तिघींनी लीलाची गंमत करायचे ठरवले. तिला शाळा बुडवल्याबद्दल कुणीच काही बोलले नाही.

काही दिवसांनी आला भोला. भोला म्हणजे लीलाचा मामा. भोलामामा नेहमी खाऊ घेऊन यायचा. त्या दिवशी नेमकी लीला शाळेत निघाली तेव्हा तिचा मामा आला. लीलाला खूप आनंद झाला. ''काय खाऊ आणलास ?'' तिने विचारले.

भोलामामा म्हणाला,

*''लीला गं लीला,*<br>
*माझ्या लाडक्या बाळा,*<br>
*खाऊ म्हणून आणलेत*<br>
*बदामी पेढे सोळा !''*

'सोळा पेढे ! ते पण बदामी !' लीला एकदम खूश झाली; पण शाळेला जायला उशीर होत होता म्हणून ती पळाली. ''संध्याकाळी आल्याबरोबर मी पेढे खाणार !'' लीला ओरडतच गेली. शाळेत दिवसभर तिच्या डोळ्यांसमोर पेढे नाचत होते. ''पेढे कुठे आहेत ?'' लीलाने आल्याबरोबर विचारले. आई म्हणाली, ''शिंकाळ्यावरच्या बुट्टीत डबा ठेवलाय बघ !'' लीलाने स्टूल घेऊन डबा काढला. उघडून पाहते तर डबा सगळा रिकामा. ''आईऽऽ, यात तर एकपण पेढा नाही !'' लीला ओरडली. लीलाचे ओरडणे ऐकून आईला नवल वाटले. आई म्हणाली, ''अगं, असं कसं होईल ?'' तिने ताईला हाक मारली, ''नीला, ए नीला.'' ''काय गं आई?'' नीला परसातून पळत आली. ''अगं, पेढे कुठे गेले ?'' आईने विचारले. ''कुठे गेले म्हणजे मीच खाल्ले. मी खाल्ले आठ अन् नदीला दिले आठ.'' नीला म्हणाली.

''तू बदामी पेढे नदीत टाकलेस ! मूर्ख कुठली.'' आई नीलावर ओरडली. ''अगं हो. तू म्हणालीस,



पेढे नको खाऊ. माई म्हणाली, पेढे नको खाऊ. मग मी नदीबाईला विचारलं. नदी म्हणाली,

*''नीला गं नीला,*
*पेढे आहेत सोळा.*
*तू घे आठ, मला दे आठ.''*

''अगं, पण नदी कशी बोलेल ?'' माई अन् आई एकदम म्हणाल्या. ''कशी म्हणजे ? लीलाशी बोलते तशी !'' नीला म्हणाली.

''काय गं लीला, नदी तुझ्याशी बोलते ?'' माईने विचारले.

''अगं माई, तीच तर लीलाला गोळा खायला सांगते. शाळा बुडवायला सांगते. हो की नाही गं लीला ?'' नीला मध्येच बोलली.

लीला आता चिडली. तिची खोडी तिच्यावरच उलटली होती. आता काय करावे बरे ? तिने थोडा विचार केला अन् म्हणाली,

*''ताई, आई, माई,*
*समजलं गं बाई,*
*नदीशी बोलायला*
*आता जाणार नाही !''*

माई हसत कपाटाकडे गेली अन् डबा घेऊन आली.

*''लीला अन् नीला,*
*घ्या एकेक पेढा अन्*
*खेळायला पळा !''*

''पेढा मिळालाऽऽ'', असे म्हणत पेढा घेऊन लीला गोठ्याकडे पळाली.

''आता ही काय म्हशीला बोलायला लावणार की काय !'' माई हसून म्हणाली.

शब्दार्थ : **वावर** – शेत, शिवार. **बिनधास्त** – बेफिकीर, कसलीही काळजी न करता. **शिंकाळे** – छताला टांगलेले दोरीचे जाळे. यात दही, दुधाची भांडी ठेवतात. **बुट्टी** – बांबूची टोपली. **परस** – घरामागची मोकळी जागा.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लीलाला कसली हौस होती ?
(आ) लीलाला काय खायचे होते ?
(इ) नदीबाई कोणाकोणापेक्षा मोठी होती ?
(ई) आईने पेढ्यांचा डबा कोठे ठेवला होता ?
(उ) पेढा घेऊन लीला कोठे गेली ?

**प्र. २. खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या मनाने लिहा.**

(अ) तुम्हांला काय खावेसे वाटते?

(आ) घरातील मोठी माणसे कोणते पदार्थ खाऊ नयेत, असे सांगतात ?

(इ) तुम्हांला कंटाळा आल्यावर काय करावेसे वाटते ?

**प्र. ३. दोन अक्षरी शब्द – गळा, तीन अक्षरी शब्द – घोटाळा, चार अक्षरी शब्द – घळाघळा यांसारखे शेवटी 'ळा' हे अक्षर येणारे प्रत्येकी चार शब्द लिहा.**

**प्र. ४. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) ''नको बुडवू शाळा.''

(आ) ''काय खाऊ आणलास ?''

(इ) ''तू बदामी पेढे नदीत टाकलेस !''

(ई) ''काय गं लीला, नदी तुझ्याशी बोलते ?''

**प्र. ५. खालील शब्दांचे अनेकवचन करा.**

(अ) डबा (आ) बैल (इ) नदी (ई) डोळा (उ) दिवस (ऊ) पेढा

**प्र. ६. लीलाप्रमाणे तुम्हांला नदीशी बोलायचे असेल, तर तुम्ही नदीशी काय बोलाल ?**

**प्र. ७. या पाठात 'वावर' हा शब्द आलेला आहे. वावर या शब्दाचे दोन अर्थ सांगणारी खालील वाक्ये वाचा.**


- रामजीच्या वावरात कापसाचे पीक आहे. (वावर-शेत)
- सरपंचांच्या घरात लोकांचा नेहमी वावर असतो. (वावर-वर्दळ, ये-जा.)

याप्रमाणे दोन अर्थ असलेले पाच शब्द शोधा. प्रत्येक शब्दाचे दोन अर्थ दाखवणारी वाक्ये लिहा.

**उपक्रम :** शिक्षक किंवा पालक यांच्यासोबत तुमच्या गावातल्या नदीवर जा. नदीचे निरीक्षण करा. वहीत नोंदवा.



## आम्ही संवाद करतो












- **वरील चित्रांतील पक्षी व प्राणी आपल्या पिलांशी काय बोलत असतील याची कल्पना करून त्यांच्यातील संवाद लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. तुम्ही घरी तुमच्या आई-बाबांशी काय काय बोलता, त्यांना काय काय सांगता ते विद्यार्थ्यांना विचारावे. विद्यार्थ्यांनी लिहिलेले संवाद त्यांच्याकडून साभिनय म्हणून घ्यावे.

# ३. आम्हांलाही हवाय मोबाइल !



माझं एकदा ऐक ना आई. मी आता मोठी झाले, असं तूच नाही का म्हणालीस? मग मलाही सगळ्यांसारखा एक छान मोबाइल फोन पाहिजे की नाही? कशासाठी म्हणजे काय ? बोलण्यासाठीच ना असतो फोन? वा...! गम्मतच आहे. ताईने मागितला, की लगेच मिळतो फोन. दादा तर कॉलेजलासुद्धा नेतो त्याचा मोबाइल. बाबांकडे दोन-दोन मोबाइल असतात अन् आम्ही मागितला तर म्हणे गरज काय त्याची ?

ए... तायडे, उगीचच काहीही बोलू नकोस हं. तुला मोबाइल मिळाला, तेव्हा मी काही बोलले होते का ? हो, हो. आम्हांलाही महत्त्वाची कामं असतात, महत्त्वाचं बोलायचं असतं. दादाचा फोन घेते मी कधीकधी, पण फक्त गेम्स खेळण्यासाठीच गं. बोलण्यासाठी काय करावं मग?

आई, पुढल्या महिन्यात माझा वाढदिवस येतोय. मित्रमैत्रिणींना पार्टीसाठी बोलवायला किती मजा येईल ! 'अरे ! उद्या संध्याकाळी माझी बर्थडे पार्टी घरीच आहे गच्चीवर. तू जरा लवकर येशील ना ? गुड. अगं, खूप धमाल करू ! हो, सगळ्यांना आता फोनवरच सांगतेय. बाय.'

वाव ! किती मस्त वाटेल असे फोन करताना. आई, अगं शाळेत अचानक सुट्टी घ्यावी लागली, तर उगीच बोलणी ऐकावी लागतात सरांची. त्यापेक्षा पपा कसे घरातूनच ऑफिसला फोन करतात, तसा सरांना शाळेत फोन करायचा. 'हॅलो... गुड मॉर्निंग सर, मला आजची सुट्टी मिळेल का ? जरा महत्त्वाचं काम आहे घरी. हो सर, उद्या नक्की येणार शाळेत. थँक्यू सर.'

खूप कामं करता येतात अशी. तू सांग ना बाबांना. ताईच्या वेळी नाही का तूच सांगितलंस बाबांना. ताई तुझी लाडकी आणि मी काय दोडकी आहे का गं ? आता तुझ्याकडे नसला म्हणून काय मलाही नको का मोबाइल? अगं, माझा मोबाइल आला, की तो आपण दोघीमिळून वापरू. नक्की. आजी... तू नको आईला रागावूस. काय म्हणतेस? तुम्हा मुलांना मोबाइलवर किती वेळ बोलावं याचं भानच नसतं. अगं, मोबाइल फोनमुळे कोणालाही संपर्क करता येतो. दादा तर सारखं मित्रांना सांगतो, 'अरे, मी ग्रंथालयात अभ्यास करतोय.' तू म्हणतेस ते खरं, पण मोठी माणसं करतात असं. आम्ही मुलं नाही करणार. देऊन तर बघा आधी मोबाइल आमच्या हातात. पपांना तर सांग. बघू काय होतंय ते !

**– सूर्यकांत सराफ**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून नाट्यछटा वाचून घ्यावी. दिवाकरांच्या नाट्यछटा मिळवून त्या साभिनय सादर करण्यासाठी मुलांना प्रोत्साहन द्यावे.

# ४. या भारतात...

• ऐका. म्हणा. वाचा.



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ, संप्रदाय एक दिसू दे ।
मतभेद नसू दे ॥ धृ. ॥

नांदोत सुखे गरीब, अमीर एकमतानी ।
मग हिंदु असो ख्रिश्चन वा हो इस्लामी ।
स्वातंत्र्य-सुखा या सकलांमाजि वसू दे ।
दे वरचि असा दे ॥ १ ॥

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना ।
हो सर्व स्थळी मिळुनि समुदाय-प्रार्थना ।
उद्योगि तरुण वीर शीलवान दिसू दे ।
दे वरचि असा दे ॥ २ ॥

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी ।
खळनिंदका-मनीहि सत्य न्याय वसू दे ।
दे वरचि असा दे ॥ ३ ॥

सौंदर्य रमो घराघरांत स्वर्गियापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ति भीति बोहरी ।
तुकड्यास सदासर्वदा सेवेत कसू दे ।
दे वरचि असा दे ॥ ४ ॥

**- राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ही कविता तालासुरात म्हणून घ्यावी.

# ५. मला शिकायचंय !

खानदेशातील एक गाव. त्या गावामध्ये सखाराम व त्याचं कुटुंब राहत होतं. सखाराम व त्याची पत्नी सुलभा हे दोघं दिवसभर उन्हातान्हात मजुरी करायचे. त्यांना स्नेहा नावाची एक मुलगी होती. तिचं चौथीपर्यंतचं शिक्षण झालं होतं. ती अत्यंत अभ्यासू व कष्टाळू होती. तिचा छोटा भाऊ पिंटू पहिलीत जाणार होता. गावात चौथीच्या पुढचे वर्ग नव्हते. 'वडील आपल्याला शिक्षणासाठी परगावी पाठवतील का,' असं सारखं स्नेहाला वाटायचं. बबली नावाची तिची मैत्रीण शिक्षणासाठी शेजारच्या गावी जाणार होती. स्नेहालाही तिच्यासारखं आपण पुढे शिकावं असं वाटायचं. तिच्या मनात शिक्षणाचाच विचार सारखा घोळत होता.

एके दिवशी नेहमीसारखं काम संपवून सखाराम व सुलभा घरी आले. मुलांना घरी ठेवून ते दोघं शेतावर गेले होते. पिंटू ओट्यावर खेळत असलेला सुलभाला दिसला, पण स्नेहा कुठे दिसत नव्हती. सुलभानं लगेचच 'स्नेहा, स्नेहा' म्हणून हाका मारल्या. आईची हाक ऐकताच स्नेहाच्या रडण्याचा आवाज वाढला. एका कोपऱ्यात बसून स्नेहा रडत असलेली सुलभाला दिसली. सुलभा तिच्या जवळ गेली. रडून रडून स्नेहाचे डोळे सुजले होते. सुलभा चिंतेत पडली. 'काय झालं' म्हणून तिला विचारू लागली. तेव्हा रडवेल्या आवाजात स्नेहा बोलू लागली.



''वर्गामधल्या बबलीनं पाचवीमा नाव टाकाई गयं... मन्हंबी नाव टाका पाचवीमा. ओ माय, माले पुढे शिकानं शे... माले शिकू द्यानं.'' तेवढ्यात हातपाय धुऊन सखाराम तिथे आला.


''स्नेहा, तुले चवथीलोंग शिकाडं... आते आनखीन पुढे शिकीसन काय करशीन तू ? आपली परिस्थिती आशी गरीबीनी.... परगावले कसा धाडू तुले... एसटीमा ये-जा करनी पडीन... तनंपेक्षा आते शाय बंद... घर बशीसन धाकला भाऊले संभाय. समजनं का तुले ?'' सखाराम थोड्या रागातच म्हणाला.

''दादाले सांगना ओ माय, माले पाचवीमा जावू द्या.... शिकू द्या.'' असं म्हणत स्नेहा पुन्हा रडायला लागली. सुलभाला गहिवरून आलं. तिचे डोळे पाणावले. नवऱ्याला कसं समजावून सांगावं हेच तिला समजेना.

गावात चौथीपर्यंत शाळा होती, म्हणून गावातील बरेच लोक मुलांना चौथीपर्यंत शिकवत होते. गरिबीमुळे मुलीला परगावी शिकवणं सखारामला अवघड वाटत होतं. सखारामच्या भाऊबंदांमध्ये पोरींना कुणीही चौथीच्या पुढे परगावी पाठवून शिकवलं नव्हतं. त्यामुळे तोही त्यांचाच कित्ता गिरवणार होता. त्याचा निर्णय पक्का होता.

स्नेहाच्या वर्गामधली बबली गावच्या सरपंचांची मुलगी होती. आडगावला जाऊन सरपंचांनी पाचव्या इयत्तेत बबलीला प्रवेश घेतला होता. स्नेहाला तिचे बाबा पुढे शिकवणार नाहीत, असं मुख्याध्यापकांना समजलं. सरपंचांना बरोबर घेऊन ते सखारामच्या घरी आले.

सरपंच अचानक आपल्या घरी आलेले पाहून सखारामला अचंबा वाटला. बबली स्नेहाकडे नेहमी येत असे. स्नेहा अत्यंत हुशार मुलगी म्हणून सरपंचांना तिचं मोठं कौतुक. ''कायद्याप्रमाणे मुलीला शिकवावंच लागेल. तुझी कोणतीही अडचण असली तरी आपण ती सोडवू, पण स्नेहाला पुढे शाळेत पाठव.'' सरपंच बोलले.



मान खाली घालून सखाराम उभा होता. मुख्याध्यापक पोटतिडकीनं बोलू लागले.

''सखाभाऊ, तुमची लेक हुशार आहे. तिनं शिष्यवृत्ती परीक्षा दिली आहे. तिला पुढे शिकवा. स्वावलंबी बनू द्या.''

सरपंच समजुतीच्या स्वरात म्हणाले, ''अरे सखा, तुन्ही पोरगी एवढीच मन्ही बबली. तिनाच वर्गामधनी. तिलेबी मी धाडणार शे ना... पाचवी इयत्तामा... अरे, आडगावनी शाय आठून अर्धा तासना अंतरवर शे... मन्हा लेक संगे जाईन ती एसटीमा.''

सखाराम विचारमग्न झाला होता.

''खरं सांग सखा, तुन्हा पिंटूले पाचवीमा धाडशीनच ना ? मंग पोरगीना बाबतमाच असा भेद कसाले? सांग सखाराम.''

सखाराम निरुत्तर झाला. मुख्याध्यापकांनी बोलायला सुरुवात केली.

“अहो सखाराम, तुम्हांला माहीत आहे का, आपल्या जिल्ह्याची जिल्हाधिकारी कोण आहे ? एक महिलाच आहे. तालुक्याच्या पोलीस स्टेशनलाही इन्स्पेक्टर म्हणून महिलाच आहे. शेजारच्या गल्लीतल्या त्या दामूअण्णांची लेक डॉक्टर झाली गेल्या वर्षी. माहितीय ना तुम्हांला ! अजून किती उदाहरणं द्यायची ! आता कित्येक डॉक्टर, वकील, इंजिनियर या महिला आहेत. त्या साऱ्यांच्या पालकांनी तुमच्यासारखाच विचार केला असता तर ?”

सखारामला काय बोलावं ते सुचेना. आता त्याला पटलं होतं – ‘आपुरं शिक्शन नको.. दिनरात कष्ट करसू, रगतनं पानी करसू, पन मन्हा आंडेरले शिकाडसू...’ तसं त्यानं बोलून दाखवलं.

स्नेहानं वडिलांकडे पाहिलं व ती त्यांना आनंदानं बिलगली. सरपंच व मुख्याध्यापक त्या दोघांकडे पाहतच राहिले. स्नेहाचा चेहरा आनंदानं फुलला होता.

**– आबा गोविंदा महाजन**

**शब्दार्थ :** **पाचवीमा** – पाचवीला. **मन्हंबी** – माझंपण. **माले** – मला. **चवथीलोंग** – चौथीपर्यंत. **शिकाडं** – शिकवलं. **आते** – आता. **शिकीसन** – शिकून. **गरीबीनी** – गरिबीची. **परगावले** – परगावला. **धाडू** – पाठवू. **तुले** – तुला. **एसटीमा** – एस. टी. ने. **पडीन** – पडेल. **तनंपेक्षा** – त्यापेक्षा. **शाय** – शाळा. **बशीसन** – बसून. **धाकला** – धाकटा. **भाऊले** – भावाला. **संभाय** – सांभाळ. **अचंबा** – आश्चर्य. **तुन्ही** – तुझी. **मन्ही** – माझी. **तिनाच** – तिच्याच. **तिलेबी** – तिलापण. **शे ना** – आहे ना. **आठून** – इथून. **मन्हा** – माझ्या. **बाबतमाच** – बाबतीतच. **रगतनं** – रक्ताचं. **करसू** – करेन. **आंडेरले** – मुलीला. **शिकाडसू** – शिकवेन.

## स्वाध्याय

### प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) स्नेहा का रडत होती ?
(आ) सरपंचांनी बबलीला कोणत्या इयत्तेत प्रवेश घेतला होता ?
(इ) मुख्याध्यापक आणि सरपंच सखारामच्या घरी का गेले ?
(ई) स्नेहाला अतिशय आनंद का झाला ?

### प्र. २. तीन–चार वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) स्नेहाची आई चिंतेत का पडली ?
(आ) मुख्याध्यापक सखारामला पोटतिडकीने काय सांगू लागले ?
(इ) सरपंच समजुतीच्या स्वरात सखारामला काय म्हणाले ?
(ई) सखारामने शेवटी कोणता निर्णय घेतला ?

### प्र. ३. खालील शब्दसमूहांचा/वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

(अ) चिंतेत पडणे.
(आ) गहिवरून येणे.
(इ) डोळे पाणावणे.
(ई) अचंबा वाटणे.
(उ) पोटतिडकीने बोलणे.
(ऊ) रक्ताचे पाणी करणे.

**प्र. ४. तुम्हांला काय वाटेल, ते लिहा.**

(अ) खूप पुस्तके पाहून.

(आ) बाजारात फिरताना.

(इ) आजारी व्यक्तीला पाहून.

(ई) झोपेत असताना कोणी हाका मारल्या तर.

**प्र. ५. खानदेशातील लोक कसे बोलतात याची काही उदाहरणे खाली दिली आहेत. पाठातील संवादाची हीच वाक्ये तुम्ही तुमच्या परिसरात कशी बोलाल ते त्या-त्या वाक्यासमोर लिहा.**

| | पाठातील संवाद |
|---|---|
| (अ) | ओ माय, माले पुढे शिकानं शे ... |
| (आ) | स्नेहा, तुले चवथीलोंग शिकाडं...<br>आते आनखीन पुढे शिकीसन काय करशीन तू ? |
| (इ) | अरे सखा, तुन्ही पोरगी एवढीच मन्ही बबली.<br>तिनाच वर्गामधनी. |
| (ई) | मंग पोरगीना बाबतमाच असा भेद कसाले ? |
| (उ) | आपुरं शिक्शन नको. दिनरात कष्ट करसू,<br>रगतनं पानी करसू, पन मन्ही आंडेरले शिकाडसू. |

**उपक्रम :**

१. तुमच्या परिसरात सण-समारंभाच्या दिवशी गायली जाणारी गाणी संग्रहित करा.

२. पाच-सहा जणांचे गट बनवा. तुमच्या गल्लीत/गावात/शहरात १४ वर्षे वयापर्यंतच्या शाळेत न जाणाऱ्या मुलामुलींचा शोध घ्या. अशी मुले आढळल्यास त्यांच्या पालकांना समजावून सांगा. अशा मुलांची नावे व पत्ते शिक्षक-मुख्याध्यापक यांच्याकडे द्या.

३. माहिती सांगा.

- तुमच्या गावाचे/शहराचे नाव.
- जिल्ह्याचे नाव.
- तुमच्या गावाची/शहराची लोकसंख्या.
- तुमच्या गावाचे/शहराचे सरपंच/नगराध्यक्ष/महापौर.

## आम्ही कथा लिहितो – १

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा पूर्ण करा. यातली गंमत म्हणजे प्रत्येकाला स्वतःच्या मनासारखी कथा तयार करता येईल. कथा तयार करा आणि वर्गात सगळ्यांना ऐकवा. तयार केलेल्या कथेला शीर्षक द्या.

**मुद्‌दे :** घनदाट जंगल – वाघ आणि त्याचं पिल्लू – पिल्लू बोलत नाही – बोलायला शिकवण्यासाठी मांजरीची नेमणूक – म्याँव, म्याँव शिकवण्याचा प्रयत्न – वाघोबा वैतागतो – आता शिकवायला गाढवदादा येतात – ते खिंकाळायला सुरुवात करतात – पुन्हा वाघोबाचा वैताग आणि पिल्लू हैराण – तिसऱ्या वेळी बैलाची नेमणूक – वाघोबाचा वैताग वाढतो – एक दिवस पिल्लू जंगलात फिरते – दबा धरून बसलेला शिकारी – पिल्लावर बंदुकीचा नेम धरतो – पिल्लू डरकाळी – शिकारी धूम ठोकतो – वाघोबा खूश.



**शिक्षकांसाठी :** वरील मुद्‌दे विद्यार्थ्यांकडून स्वतंत्रपणे वाचून घ्यावे. त्यांआधारे गोष्ट लिहायला सांगावी. वर्गात प्रत्येकाकडून गोष्ट वाचून घ्यावी. विद्यार्थ्यांना वरील चित्रांच्या आधारे आणखी एखादी गोष्ट तयार करण्यास प्रोत्साहन द्यावे.

# ६. मायेची पाखर



कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबद्दल मला अत्यंत आदर आहे. एकदा मी पुण्याला जाताना वाटेत सातारला थांबलो. भाऊरावांना भेटावे म्हणून त्यांच्याकडे गेलो. त्यांची भेट झाली. मला खूप समाधान वाटले.

सर्वजण भाऊरावांना अण्णा म्हणत असत. अण्णांनी मला संस्था दाखवण्यासाठी नेले. संस्था पाहून झाली. अंधार पडला, रात्र झाली. 'आता इथंच मुक्काम करा!' अण्णांनी मला आग्रह केला. अण्णांचा तो आग्रह ! नाही कसे म्हणायचे ? राहिलो झाले तिथे.


मी संस्थेचा परिसर पाहत निघालो. संस्थेच्या आवारात एक मोठे वडाचे झाड होते. आजूबाजूलाही गर्द झाडी होती. थंडीचे दिवस होते. कडाक्याची थंडी पडली होती. मुले पत्र्याच्या खोल्यांतून राहत होती. पत्र्यांनी बनवलेल्या अशाच एका खोलीत अण्णा बसलेले होते. मीही त्यांच्याजवळ जाऊन बसलो. त्यांनी मला जेवणाचा आग्रह केला.

'नुकतंच जेवण झालंय माझं,' असे मी त्यांना सांगितले. अर्थात हे सर्व खोटेच होते. वसतिगृहाच्या मुलांनी केलेले जेवण ते कसे असणार ! म्हणून मी जेवणाची टाळाटाळ केली.

मुलांची जेवणे झाली, प्रार्थना झाली आणि ती सर्व झोपी गेली. माझ्या पोटात मात्र कावळे ओरडत होते. मग मला झोप कशी येणार ? मी तसाच पडून राहिलो.

अण्णांनी हे ओळखले. त्यांनी एका मुलाला आज्ञा केली, ''जा रे, स्वयंपाकघरात काही शिल्लक असेल ते घेऊन ये बघू !'' मुलगा धावतच स्वयंपाकघरात गेला. पिठले, भाकरी, कांदा, तेल एका ताटात घेऊन आला. मी अधाश्यासारखा त्यावर तुटून पडलो. पंचपक्वान्नांपेक्षाही ते मला रुचकर लागले. मग काय, बिछान्यावर पडल्या पडल्याच डोळा लागला. मध्यरात्र उलटून गेली. कशाची तरी चाहूल लागून मला जाग आली. अण्णा उठले होते. त्यांनी कंदील हातात घेतला. प्रत्येक मुलाला झोप लागली की नाही, त्याच्या अंगावर पांघरूण आहे की नाही ते अण्णा पाहू लागले. त्यांनी पाहिले, की एक मुलगा थंडीने कुडकुडत आहे. अण्णा त्याच्याजवळ गेले. त्यांनी त्याला आपल्या दोन्ही हातांनी अलगत उचलले. स्वतःच्या बिछान्यावर आणून झोपवले. स्वतःची कांबळी त्याच्या अंगावर घातली. त्याला अगदी आपल्या पोटाशी धरले. त्या उबेत तो मुलगा गाढ झोपी गेला.

त्या मुलांपैकी कितीतरी जणांना आई नव्हती. कितीतरी जणांना वडील नव्हते; पण अण्णांनी त्यांच्यावर पित्याच्या प्रेमाचा आणि मातेच्या मायेचा वर्षाव केला होता. अशी होती अण्णांच्या मायेची पाखर. हे सर्व मी उघड्या डोळ्यांनी पाहिले.



सकाळी मी उठलो. अण्णांना कडकडून भेटलो. नकळतच माझ्या मुखातून शब्द बाहेर पडले, ''अण्णा, आपण खरेखुरे या मुलांचे आईबाप आहात. या मुलांचेच नव्हे, तर या महाराष्ट्रातील गोरगरिबांच्या मुलांचे आपण पालक आहात. आपणांस उदंड आयुष्य मिळो !''

अण्णा आयुष्यभर गोरगरिबांच्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी झटत राहिले. रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रभर शाळा सुरू केल्या. उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये सुरू केली. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उत्तुंग कार्यामुळे त्यांना सर्वजण 'कर्मवीर' म्हणून ओळखतात.

**– पां. चिं. पाटील**

(**मायेची पाखर –** पक्षी मायेपोटी आपल्या पिलांना पंखाखाली घेतात, तसेच आपल्या संस्थेत शिक्षणासाठी आलेल्या मुलांवर भाऊराव पाटील यांनी जिवापाड प्रेम केले.)

**शब्दार्थ : पोटात कावळे ओरडणे –** खूप भूक लागणे. **अधाशी –** हावरा, खादाड. **रुचकर–** चवदार. **बिछाना –** अंथरूण. **थंडीने कुडकुडणे –** खूप थंडी वाजणे. **पोटाशी धरणे –** मायेने जवळ घेणे. **ऊब –** उष्णता. **मायेचा वर्षाव करणे –** खूप प्रेम करणे. **उदंड –** खूप, पुष्कळ.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पाहुण्यांनी अगोदर जेवायचे का नाकारले ?

(आ) वसतिगृहातील मुलांवर अण्णांची माया कोणाप्रमाणे होती ?

(इ) अण्णा आयुष्यभर कोणाच्या शिक्षणासाठी झटत राहिले ?

(ई) कर्मवीर भाऊरावांनी कोणत्या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शाळा सुरू केल्या ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) संस्थेच्या आवारात एक मोठे .................. झाड होते.

(आ) स्वतःची .................. त्याच्या अंगावर घातली.

(इ) त्या मुलांपैकी कितीतरी जणांना .................. नव्हती.

(ई) ''अण्णा, आपण खरेखुरे या मुलांचे ........... आहात.''

**प्र. ३. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) ''आता इथंच मुक्काम करा !''

(आ) ''जा रे, स्वयंपाकघरात काही शिल्लक असेल ते घेऊन ये बघू !''

(इ) ''आपणांस उदंड आयुष्य मिळो !''

**प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लेखक उपाशी आहेत, हे समजल्यावर अण्णांनी काय केले ?

(आ) मध्यरात्रीनंतर कोणता प्रसंग घडला ?

(इ) सकाळी उठल्यावर लेखकांच्या तोंडून कोणते उद्गार निघाले ?

**प्र. ५. वाक्प्रचार व त्यांचा अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) टाळाटाळ करणे. | (अ) झोप लागणे. |
| (२) पोटात कावळे ओरडणे. | (आ) सतत प्रयत्न करणे. |
| (३) डोळा लागणे. | (इ) एखादी गोष्ट करायचे टाळणे. |
| (४) झटत राहणे. | (ई) खूप भूक लागणे. |

**प्र. ६. लेखकाच्या पोटात कावळे ओरडत होते, म्हणजे लेखकाला खूप भूक लागली होती. आता खालील वाक्यांतील रंगीत शब्दांचा अर्थ शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

(अ) भरपूर जेवण झाल्यावर नाना **अजगरासारखे पडून** होते.

(आ) दुपारच्या वेळी हळूच खाऊ घेताना बंड्या अजिबात आवाज होऊ देत नाही; म्हणून त्याला सगळे **मांजरीच्या पायाचा** म्हणतात.

**प्र. ७. लिहा.**

लेखकाला कर्मवीर भाऊराव पाटलांबद्दल अत्यंत आदर आहे. तसा तुम्हांला आदर वाटणाऱ्या व्यक्तींबद्दल पाच ते सात ओळींत लिहा.

**प्र. ८. सुरुवातीला एक वाक्य दिले आहे. तुमच्या मनाने पुढील वाक्ये लिहा.**

(अ) सकाळची वेळ होती.

......................................

......................................

......................................

......................................

(आ) बागेत गेल्यावर मला एक अळी दिसली.

......................................

......................................

......................................

......................................

**उपक्रम :**

१. शैक्षणिक संस्था स्थापन केलेल्या थोर समाजसुधारकांचे फोटो मिळवा. चिकटवहीत चिकटवून त्यांची नावे लिहा.

२. तुमच्या गावातल्या वसतिगृहात जाऊन तेथील मुलांशी/मुलींशी गप्पा मारा. तुम्हांला तिथे आढळलेल्या गोष्टींची नोंद करा.

३. आपल्या परिसरातील शैक्षणिक संस्थांची यादी करा.

- **वाचा. समजून घ्या.**



अशा पुस्तकांमधून छान छान गोष्टी वाचता येतात.

या पुस्तकावर पेन आहे.

या पुस्तकावरून माझी आणि ताईची भांडणं होतात.

या पुस्तकाच्या त्रेपन्नाव्या पानावर घुबडाचे चित्र आहे.

पुस्तकांना नीट हाताळावे.

या पुस्तकातून मी मजेशीर विनोद वाचले.

मला हे पुस्तक आवडतं.

या पुस्तकातली प्रत्येक गोष्ट विनोदी आहे.

या पुस्तकावर तीस रुपये सूट मिळाली होती.

- **'पुस्तक' हा एकच शब्द वरील वाक्यांमध्ये कसा विविध प्रकारे आला आहे ते वाचा. नीट समजावून घ्या. आता 'डुक्कर' हा शब्द योग्य प्रकारे वापरून खालील वाक्ये पूर्ण करा.**

(अ) काही लोक शेतीसोबत ................. पाळण्याचा व्यवसाय करतात.

(आ) ................. आपल्याला चामडे मिळते.

(इ) ................. वराह असेही म्हणतात.

(ई) डुक्कर पाळणारे लोक ................. खूप माया करतात.

(उ) खवळलेल्या ................. मारलेल्या मुसंडीला लोक घाबरतात.

**शिक्षकांसाठी :** वरील चौकटीत 'पुस्तक' या शब्दाची काही रूपे दिली आहेत. विद्यार्थ्यांना ती समजावून सांगावी. असेच काही शब्द घेऊन त्या शब्दांची विविध रूपे विद्यार्थ्यांना समजावून सांगावी.

# ७. धूळपेरणी

• ऐका. म्हणा. वाचा.

असो बरकत
धूळपेरणीला,
लागला मातीचा
जीव झुरणीला.


हिरव्या पिसांचा
ध्यास धरणीला,
टिपूर मोत्यांची
आस मोरणीला.

येऊ नये कधी
दिवस जाचक,
कासावीस डोळे
बनले चातक.

कोरडे नक्षत्र
पूर पापणीला,
आलेलं आभूट
दूर दाटणीला.

मिळता डोळ्यांना
मेघुट इशारे,
मातीच्या कणांना
फुटले धुमारे.

**– अशोक कौतिक कोळी**





**शब्दार्थ :** **बरकत** – भरभराट. **धूळपेरणी** – पाऊस पडण्यापूर्वी केलेली पेरणी. **आस** – ओढ, इच्छा, अपेक्षा. **जाचक** – त्रास देणारे. **कासावीस** – व्याकूळ. **चातक** – ढगातील पाणी पिऊन राहतो अशी समजूत असलेला एक पक्षी. **आभूट** – ढगाळ आकाश. **मेघुट** – ढग दाटून येणे. **धुमारे** – झाडाला फुटलेली नवी पालवी.

# स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कोणाचा जीव झुरणीला लागला ?

(आ) धरणीला कशाचा ध्यास आहे ?

(इ) कोणते दिवस येऊ नयेत, असे कवीला वाटते ?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कोरडे नक्षत्र गेल्यावर शेतकऱ्याच्या मनात कोणकोणते विचार येत असतील ?

(आ) शेतकऱ्याच्या शेतात भरपूर पीक आले, तर त्याच्या मनात कोणते विचार येतील ?

(इ) पाऊस पडला नाही तर काय होईल, असे तुम्हांला वाटते ?

**प्र. ३. ओळी पूर्ण करा.**

(अ) ........... बरकत
धूळ ...........,

(इ) कासावीस ...........
बनले ............

(आ) ........... मोत्यांची
आस ........... .

(ई) मिळता ...........
........... इशारे,

**प्र. ४. खालील ओळींचा अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) हिरव्या पिसांचा
ध्यास धरणीला.

(आ) मातीच्या कणाला
फुटले धुमारे.

**प्र. ५. पावसाळा येऊनही पाऊस पडत नसला, की शेतकऱ्यांना दिवस जाचक म्हणजे त्रासाचे वाटू लागतात. तुमच्या परिसरातील खालील व्यक्तींना कोणते दिवस जाचक वाटत असतील, याविषयी त्यांच्याशी चर्चा करा.**

(अ) बांधकामावर काम करणारे मजूर.

(आ) आई-वडील.

(इ) ऊसतोडणी कामगार.

(ई) शिक्षक.

(उ) शाळेबाहेर खाऊ विकणारे.

**प्र. ६. ही कविता धूळपेरणीची आहे. या कवितेत शेतकरी पावसाची वाट पाहत आहे. पाऊस आला नाही, तर त्याला शेती करता येणार नाही. या उलट काही लोकांना खूप पाऊस आला, तर काम/व्यवसाय करता येणार नाही. अशा लोकांची माहिती घ्या. उदा.,** रस्त्याच्या कडेला बसून भाजी विकणारे.

**उपक्रम :**

१. शेतकरी, शेतमजूर यांपैकी कोणाचीही मुलाखत घ्या.

२. पावसाच्या नक्षत्रांची नावे माहीत करून घ्या.

३. अन्नधान्य योग्य पद्धतीने वापरले जावे, याची जाणीव सर्वांना करून देण्यासाठी घोषवाक्ये तयार करा.

## चला, वाचूया.



पाऊस पडेल, या आशेने शेतकरी पेरणी करतात. त्याला धूळपेरणी म्हणतात. पाऊस लवकर पडेल, अशी त्यांना आशा असते. पाऊस उशिरा पडला किंवा फारच कमी पडला, तर पेरलेले बी वाया जाते. दुबार पेरणी करावी लागते. हा खर्च शेतकऱ्यांना परवडत नाही आणि दुबार पेरणीचे पीकही पहिल्या पेरणीसारखे चांगले येत नाही. कधी पाऊस खूप पडतो तर कधी पडतच नाही. उगवलेले पीक वाया जाते. शेतात पीक पिकले तरी पिकांवर अनेकवेळा रोग पडतो. कडाक्याची थंडी पडून देखील पीक वाया जाते आणि शेतकरी अडचणीत सापडतात.

इयत्ता दुसरीच्या पाठ्यपुस्तकात 'भाकरीची गोष्ट' हा पाठ दिलेला आहे. तो तुम्ही वाचा. धान्य पिकवण्यामागे शेतकऱ्यांना किती कष्ट करावे लागतात ते त्या पाठात दिलेले आहे. ऊन, पाऊस, कडक थंडी, दिवस, रात्र शेतकरी शेतात कष्ट करत असतात.

'आपण धान्य सहज विकत घेऊ शकतो', असे आपल्याला वाटते; परंतु नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा पाण्याअभावी धान्यच पिकले नाही, तर कितीही पैसा असूनही त्याचा उपयोग नाही. आपल्याला जगण्यासाठी अन्नाची गरज असते. त्यासाठी गरजेएवढेच अन्न शिजवणे, जेवताना हवे तेवढेच अन्न ताटात घेणे, ताटात अन्न न टाकणे या प्रकारे आपण अन्नधान्याची जपणूक केली पाहिजे.



## वाचा.

**रुग्ण** : माझा एक दात खराब झाला आहे.

**डॉक्टर** : त्या जागी आपण दुसरा दात बसवूया.

**रुग्ण** : दात मात्र माझ्या दातासारखाच हवा.

**डॉक्टर** : ते शक्य नाही.

**रुग्ण** : का?

**डॉक्टर** : एवढे घाणेरडे दात माझ्याकडे नाहीत.

# ८. गुणग्राहक राजा



तिशी ओलांडलेले सयाजीराव गायकवाड फेरफटक्यास निघाले. बरोबर मानकरी नारायणराव घाटगे होते. एवढ्यात मुलांचा हसण्या-खिदळण्याचा आवाज ऐकू आला. महाराजांनी घोडा थांबवला. आवाजाच्या दिशेनं पाहिलं. तिथे एक वडाचं झाड होतं. एक पोरगा माकडासारखा उड्या मारत खोडावर चढला. दुसरा पोरगा त्याचा पाठलाग करत होता. पहिल्यानं पारंबी पकडली. माकडासारखा झोका घेतला. घोड्यावर बसल्यासारखा फांदीवर बसला. दोघा पोरांचा सुरपारंबीचा खेळ सुरू झाला. सयाजीराव महाराज देहभान विसरून खेळ बघू लागले. मनानं त्यांच्या बालपणातील 'मौजे कवळाणे' गावी आले. तेथील मारुती मंदिराजवळील वडाच्या झाडावर चढले. पोरांसोबत सुरपारंबी खेळ खेळू लागले.

थोड्या वेळानं महाराज भानावर आले. स्वत:शी हसले. निघताना मानकऱ्यांस म्हणाले, ''पोरं चपळ आहेत. कोणाची पोरं आहेत ही ? विद्याधिकाऱ्यांना सांगून त्यांना राजवाड्यात बोलवा.''

सयाजीराव गायकवाड राजवाड्यात परतले; पण वडाच्या झाडावर माकडासारखी चढणारी आणि उतरणारी पोरं त्यांना नजरेसमोर दिसत होती. घडलेला प्रसंग त्यांनी महाराणीसाहेबांना सांगितला. त्यांनीही तो खेळ पाहण्याची इच्छा व्यक्त केली. सयाजीरावांनी विद्याधिकारी श्री. काटावालांना बोलावलं. नजरपागेतली ती पोरं शोधून आणायचा हुकूम केला. नारायणराव घाटगे यांनी त्या पोरांची नावं व राहण्याचं ठिकाण सांगितलं.

विद्याधिकाऱ्यांचा शिपाई त्या भागात पोहोचला. त्यानं पोरांचा शोध घेतला. गजानन आणि काळूला साहेबांकडे घेऊन आला. ''झाडावर चढण्याचा तुमचा खेळ बघून महाराज खूश झाले. हा खेळ महाराणीसाहेबांनाही पाहायचाय. उद्या तिसऱ्या प्रहरी तुम्ही दोघे राजवाड्यात या !'' विद्याधिकारी म्हणाले.

गजानन हा यशवंतराव माणिकचा, तर काळू रहिम चाबूकस्वाराचा मुलगा होता. महाराजांनी पोरांना राजवाड्यात बोलावलं. गल्लीत वार्ता पसरली. पोरांची उत्सुकता वाढली. तरीही घरच्यांना काळजी वाटू लागली, कारण महाराज शिस्तीचे होते.

दुसरा दिवस उजाडला. विद्याधिकाऱ्यांनी पोरांना राजवाड्यात आणले. दोघांचे सदरे मळलेले होते. चेहऱ्यावर मात्र तरतरी होती.

राजवाड्याच्या समोर मोठं झाड होतं. महाराज आणि राणीसाहेब पोरांना घेऊन तिथे आले. बरोबर तीन राजपुत्रही होते. बसण्यासाठी बाजूला सोफे ठेवले होते.


''काय नाव बाळांनो तुमचं ?'' महाराजांनी विचारताच गजानन म्हणाला, ''माझं नाव गजानन माणिक आणि हा काळू चाबूकस्वार.''

''छान ! आम्ही परवा तुमचा सुरपारंबीचा खेळ पाहिला. आज राणीसाहेबांना तो दाखवा.''

गजाननं काळूला खूण केली. मानकऱ्यांनी सूर तयार ठेवला होता. दीड हात लांब व करंगळीच्या जाडीची ती काठी होती. काळूनं सूर हाती घेतला. एक पाय थोडा उचलून पायांखालून सूर दूर फेकला. गजानन तो सूर आणायला धावला. तोपर्यंत काळू सरसर झाडावर चढला.

काळू आणि गजाननची झाडावर चढण्या-उतरण्याची कसरत सुरू झाली. शेवटी गजाननं काळूला पकडलं. आता गजाननं सूर फेकला आणि तो सरकन झाडावर चढला. काळू सूर आणून त्याच्या मागे वर चढला. गजानन फांदीच्या टोकावर जाऊन लटकला. काळू जवळ येताच त्यानं जमिनीवर उडी मारली. पुन्हा तो खोडावर चढला.

गजाननला बाद करणं काळूला जमेना. दोन्ही पोरं धावपळीनं घामाघूम झाली. महाराजांनी खेळ थांबवला. दोघांना जवळ बोलावलं. खुशीत त्यांची पाठ थोपटत ते म्हणाले, ''छान खेळलात. खेळात हारजीत महत्त्वाची नाही. खेळणं महत्त्वाचं आहे. आम्ही तुम्हांला बक्षीस देणार आहोत.''



महाराजांनी घाटग्यांना खूण केली. एका तबकात जरीच्या दोन टोप्या होत्या. त्यांनी गजाननला जवळ बोलावले. ''तू हरला नाहीस म्हणून ही भरजरी टोपी बक्षीस.'' असं म्हणून त्यांनी त्याच्या डोक्यावर टोपी ठेवली. काळूकडे वळत राणीसाहेब म्हणाल्या, ''तू पाठलाग छान केलास म्हणून मी तुला ही जरीची टोपी बक्षीस देत आहे.''

''तुमचा खेळ पाहताना आम्हांला आनंद झाला. एवढंच नाही, तर आम्ही खेळत आहोत, असा अनुभव

घेत गेलो.'' महाराज म्हणाले. त्यांनी पोरांना बसवलं. मिठाई खाऊ घातली.

पोरं घोडागाडीतून घरी परतली. त्यांच्या खेळाची आणि टोपीची गोष्ट मोहल्लाभर पसरली.

गजाननच्या शाळेत वार्षिक बक्षीस समारंभ होता. महाराजच बक्षीस समारंभासाठी आले होते. एक पोरगा पुन्हा पुन्हा वेगवेगळी बक्षिसं घेण्यासाठी येऊ लागला. अभ्यासात, चित्रकलेत, एवढंच काय हस्ताक्षर स्पर्धेतही तोच होता. अठरा बक्षिसं त्या पोरानं घेतली. महाराजांनी या गजानन माणिकला ओळखलं. त्याला बघून त्यांना आनंद झाला. ते म्हणाले, ''बघू तुझं हस्ताक्षर !''

गजाननं कागद-शाई मिळवली. कामटीचा बोरू केला. कागदावर लिहिलं -'श्रीमंत सयाजीराव महाराज की जय !' महाराजांनी त्याला जरीची टोपी बक्षीस दिली. विद्याधिकाऱ्यांकडे वळून ते म्हणाले, ''पोरगा गुणी आहे. त्याकडे लक्ष द्या. उद्याचं हे बडोद्याचं रत्न आहे.''

हाच मुलगा पुढे बडोद्याचं राजरत्न गजानन माणिकराव झाला.

**- बाबा भांड**

**शब्दार्थ : देहभान विसरणे -** स्वतःची जाणीव विसरणे. **सूर -** सुरपारंबी या खेळातील काठी.
**मोहल्ला -** गल्ली/शहराचा काही भाग. **बोरू -** बांबूपासून तयार केलेली लेखणी.

## स्वाध्याय

### प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) मुले कोणता खेळ खेळत होती ?
(आ) महाराजांनी गजाननला कोणते बक्षीस दिले ?
(इ) गजाननने कागदावर बोरूने काय लिहिले ?

### प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.

(अ) थोड्या वेळानं महाराज ............... आले.
(आ) पोरं ............... घरी परतली.
(इ) ''बघू तुझं ............... !''

### प्र. ३. कोण, कोणाला म्हणाले ?

(अ) ''पोरं चपळ आहेत. विद्याधिकाऱ्यास सांगून त्यांना राजवाड्यात बोलवा.''
(आ) ''झाडावर चढण्याचा तुमचा खेळ बघून महाराज खूश झाले.''
(इ) ''काय नाव बाळांनो तुमचं ?''
(ई) ''पोरगा गुणी आहे. त्याकडे लक्ष द्या. उद्याचं हे बडोद्याचं रत्न आहे.''

### प्र. ४. थोडक्यात उत्तरे लिहा.

(अ) मुलांनी राणीसाहेबांना सुरपारंबीचा खेळ कसा दाखवला ?
(आ) गजाननने कशाकशात बक्षिसे मिळवली ?

**प्र. ५. खालील वाक्यांमधील 'सूर' या शब्दाचे वेगवेगळे अर्थ लिहा.**

(अ) काळूने सूर दूर फेकला.

(आ) आज गाण्यामध्ये खाँसाहेबांचा सूर भन्नाट लागला होता.

(इ) 'एक, दोन, तीऽऽऽन' म्हणत मुलांनी पाण्यात सूर मारला.

**प्र. ६. खालील वाक्यांमधील रंगीत शब्दांचे योग्य अर्थ लिहा.**

(अ) कुणासमोरही **हार** न मानणाऱ्या पहिलवानाचा **हार** घालून सत्कार करण्यात आला.

(आ) सरपंच झाल्यापासून सरोजाला साऱ्या गावाकडून **मान** मिळू लागला. तिचा नवरादेखील आता ताठ **मान** करून फिरतो.

(इ) हातात **तीर**-कमान घेऊन झिंगरूने नदीचा **तीर** गाठला.

(ई) खळखळ वाहणारं **पाटाचं** पाणी पाहून देवजी परतला. घरी आला की लगेच **पाटावर** बसला.

**असे आणखी शब्द शोधून वाक्ये बनवा.**

**उपक्रम :**

१. घरच्या व्यक्तींशी बोलून त्यांच्या लहानपणी ते कोणते खेळ खेळत होते व ते खेळ कसे खेळत होते यांविषयी माहिती जमवा.

२. वेगवेगळ्या खेळांविषयीची माहिती व चित्रे जमवून संग्रह करा.

३. बाजारात फिरून वेगवेगळ्या पद्धतीच्या टोप्यांची माहिती मिळवा. टोप्यांची चित्रे मिळवा. कागदाची/कापडाची टोपी बनवा. ती कशी तयार केली ते सांगा. वर्गात प्रदर्शन भरवा.

## चला, वाचूया.



'शिक्षण हाच सर्व सुधारणांचा पाया आहे', हा विचार सयाजीराव महाराजांनी स्वीकारला. समाजाच्या सर्व थरांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे, यासाठी त्यांनी बडोदा संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत देण्याचा कायदा केला. त्यांनी अनेक गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन, त्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत करून परदेशी पाठवले. गोरगरिबांची व दलितांची पिळवणुकीतून सुटका केली. सर्व जाती-धर्मांतील मुलांना शाळांमध्ये प्रवेश देण्यास सांगितले. त्यांनी सार्वजनिक ग्रंथालयाचाही कायदा केला व वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन दिले.

शेतीची प्रगती करण्यासाठी धरणे बांधली. शेतकऱ्यांची सावकारांकडून होणारी छळवणूक थांबवली. लोकांच्या हाताला काम मिळाले पाहिजे, यासाठी सयाजीरावांनी कापडाची गिरणी सुरू केली. अनेक उद्योगधंद्यांना प्रोत्साहन दिले. त्यांना देशाबद्दल प्रचंड प्रेम होते.

महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांना त्यांनी मदत केली. सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी सत्तेचा वापर केला. त्यामुळे आपण समाजसुधारक म्हणून त्यांचा गौरव करतो. सयाजीराव एक आदर्श राजे होते.

## आम्ही आमचे अनुभव लिहितो

- **वाचा. समजून घ्या.**

मुलांनो, तुम्ही अनेक चांगल्या गोष्टी करता. घडलेल्या घटना, प्रसंग तुम्ही मित्रांना सांगता, घरी सांगता; पण तुम्ही लिहून ठेवता का? नाही ना ? काही मुले लिहून ठेवतात. तुम्हीही लिहिण्याचा प्रयत्न करा.

तुमच्याच वयाच्या 'सुमन सोनवणे' या मुलीने लिहिलेला एक अनुभव खाली दिला आहे. तो वाचा. तुम्हांला आलेले अनुभव तुमच्या वहीत लिहा.

आई आणि बाबा बाजारात गेले होते. मी आणि शेजारचा अन्वर गृहपाठ-वही पूर्ण करत बसलो होतो. अंगणातल्या झाडाच्या सावलीत बसून खेळायला, अभ्यास करायला आम्हां दोघांना खूप आवडायचे. आम्ही दोघेही लिहिण्यात दंग होतो. इतक्यात जोराने ओरडण्याचा आवाज आला. आम्ही दचकलो व आवाजाच्या दिशेने धावलो. बघतो तर काय ! मांजरीचे छोटेसे गोजिरवाणे पिलू ! त्याच्या पायाला जखम झाली होती. त्या पिलाच्या पायावरून कुणाची तरी सायकल गेली असावी, असे आम्हांला वाटले. ते खूप घाबरले होते. आम्हीही घाबरून थोडे लांबच जाऊन उभे राहिलो. ते खूप ओरडू लागले. पुन्हा त्याच्याजवळ जाऊन उभे राहिलो. ते इकडे तिकडे पाहत विचित्र आवाज काढत होते. पिलाच्या पायाजवळ थोडेसे रक्त आलेले मला दिसले. लगेच मी घरातून हळद आणली, पाणी आणले व त्याच्या जखमेवर हळद लावली. त्याला पाणी पाजले.

तेवढ्यात आई-बाबा आले. आम्ही त्यांना सर्व काही सांगितले. मांजरीचे पिलू घराच्या पाठीमागच्या दिशेकडे पाहत होते. ते बाबांच्या लक्षात आले. बाबांनी घराच्या मागे जाऊन शोधले. आमच्या घरामागच्या पडक्या भिंतीजवळ एक मांजर व तिची ३-४ पिले आम्हांला दिसली. ती मांजर या जखमी पिलाची आई असावी, असे आम्हांला वाटले. बाबांनी पिलाला अलगत उचलले आणि त्याच्या आईजवळ सोडले. आईला पाहताच ते पिलू आईला बिलगले.

**- सुमन सोनवणे, पोलादपूर.**

# ९. ईदगाह

'रमजान' महिन्याच्या तीस दिवसांनंतर आज ईदचा दिवस आला आहे. किती रम्य, किती सुंदर सकाळ आहे ही ! झाडं हिरवीगार दिसत आहेत. शेतात समृद्धी डोलत आहे. आकाश लालेलाल झालंय. आज सूर्य तर पहा किती सुरेख दिसतोय ! किती शांत, किती सुखद ! जणू तो साऱ्या जगाला ईदच्या शुभेच्छा देत आहे. गावात नुसती गडबड चालली आहे. ईदगाहला जाण्याची तयारी सुरू आहे.

मुलंतर खूप आनंदात आहेत. कुणी एक दिवसाचा रोजा पाळलाय तोही फक्त दुपारपर्यंत; पण कुणीतर तोही पाळलेला नाही; पण ईदगाहला जाण्याचा त्यांचा आनंद उतू जातोय. रोज ईदच्या नावाचा जप चालला होता, ती ईद आज उगवली आहे. मुलांना सगळ्यांत जास्त घाई झालीय. लोक ईदगाहला का येत नाहीयेत, असा प्रश्न त्यांना पडलाय.

सगळ्यांत जास्त आनंदात आहे हमीद. ४-५ वर्षांचा हा गरीब चेहऱ्याचा, हडकुळा मुलगा. याचे अब्बा मागच्यावर्षीच कॉलऱ्याला बळी गेले आणि अम्मी पांढरी पडत पडत एक दिवस मरून गेली. आता हमीद आपल्या म्हाताऱ्या अमीनाआजीच्या कुशीत निजतो. तिच्याजवळ तो सुखात आहे. 'अब्बाजान पैसे कमवायला गेले आहेत. खूप पिशव्या भरून पैसे घेऊन ते परत येतील. अम्मीजान अल्लाच्या घरून आपल्यासाठी खूप छान छान गोष्टी आणायला गेली आहे,' असा त्याचा विश्वास आहे, म्हणूनच तो आनंदात आहे. हमीदजवळ जोडे नाहीत, डोक्यावर जुनीपुराणी टोपी आहे, तिचा वरचा भाग काळा पडला आहे, तरी तो खुशीत आहे.

अमीनाच्या हृदयात कसंसंच होत आहे. गावातली मुलं आपापल्या वडिलांबरोबर ईदगाहला चालली होती. हमीदला अमीनाशिवाय कोण आहे ? 'त्याला एकटं कसं पाठवायचं ? त्या गर्दीत पोरगं कुठं हरवलं तर ? नाही, अमीना त्याला असं एकटं पाठवू शकणार नाही. एवढासा जीव एवढं अंतर चालेल तरी कसा ? पायाला फोड नाही का येणार ? जोडेही नाहीत त्याच्याजवळ!' अमीनाबीकडे फक्त दोन आणे आहेत. तीन पैसे हमीदच्या खिशात व उरलेले तिच्या बटव्यात. एवढंसं धन व हा ईदचा सण ! हमीद आजीला सांगतो, "तू घाबरू नकोस. मी सगळ्यांच्या आधी परत येईन." अमीनानं दिलेले तीन पैसे घेऊन हमीद सवंगड्यांबरोबर निघतो.

गावाहून लोक निघाले. इतर मुलांसोबत हमीदपण चालला होता. कधी ते सगळे धावत धावत पुढे जायचे. कधी एखाद्या झाडाखाली उभे राहून बाकीच्यांची वाट पाहायचे.

अचानक समोर ईदगाह दिसला. चिंचेची दाट सावली त्यावर पडलेली आहे. खाली पक्की फरशी लावलेली आहे. त्यावर जाजम घातलेलं आहे. रोजे करणाऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या आहेत. जाजम नसलेल्या भागापर्यंत रांगा गेल्या आहेत. नंतर येणारे मागे रांगेत उभे आहेत. पुढे जागा मुळीच नाही. इथे सगळे सारखेच आहेत, कुणाचा पैसा वा प्रतिष्ठा पाहिली जात नाही. किती छान व्यवस्था आहे ! सगळे एकदम वाकत आहेत, गुडघे टेकत आहेत. कितीतरी वेळा ही हालचाल होतेय. जणू विजेचे लाखो दिवे एकदम लागावेत, विझावेत असं दृश्य दिसत आहे.


नमाज संपली. लोक परस्परांना मिठी मारून भेटत आहेत. आता सारे मिठाईच्या व खेळण्यांच्या दुकानांकडे धावतील. हा पाहा झोपाळा. एक पैसा देऊन यावर बसलात, तर घटकेत आकाशात फिरतोय असं वाटेल, तर घटकेत जमिनीवर पडतोय असं वाटेल. हे चक्र आहे. लाकडाचे हत्ती, घोडे, उंट या चक्राला लागलेले आहेत. एक पैसा दिला तर पंचवीस चकरांची मजा घेता येईल. महमूद, मोहसिन, नूर आणि सम्मी त्या चक्रातील घोड्यांवर, उंटावर बसत आहेत. हमीद दूर उभा आहे. त्याच्याजवळ तर तीनच पैसे आहेत. आता खेळण्यांची खरेदी. दुकानांमध्ये तऱ्हेतऱ्हेच्या खेळण्यांचे ढीग पडले आहेत. खेळणी तरी किती प्रकारची – राजा, शिपाई, गुन्हेगार, वकील, पाणक्या, साधू. वा ! किती सुंदर खेळणी आहेत ही ! महमूदनं शिपाई घेतलाय – खाकी पोशाख, लाल पगडी, खांद्यावर बंदूक. वाटतंय, जणू आत्ताच कवायत करून येतोय. मोहसिनला पाणक्या आवडलाय – कमरेला पखाल लावलेला, कमरेतून वाकलेला, सगळ्यांना पाणी वाढणारा. सगळी खेळणी दोन-दोन पैशांना मिळतायत, पण हमीदकडे तीनच पैसे आहेत. तो इतकी महागडी खेळणी कशी घेणार ?

खेळण्यांनंतर नंबर आला मिठाईचा. कुणी रेवड्या घेतल्या तर कुणी गुलाबजामुन, कुणी जिलेबी खातंय तर कुणी करंजी. हमीद मात्र त्याच्या आजीचा विचार करतोय. 'मी तर चिमटा खरेदी करणार. चिमटा पाहून आजी खूश होईल. मला भरभरून आशीर्वाद देईल.'

हमीद एका लोखंडी वस्तूंच्या दुकानापुढे थांबला. तिथे काही चिमटे ठेवलेले होते. फुलके तव्यावरून उतरवायला, विस्तवावर फुलके भाजायला उपयोगी आहे हा चिमटा. पुन्हा कोणी विस्तवातले निखारे मागायला आलं, तर त्याच चिमट्यानं पटापट निखारे उचलून द्यायचे ! बिचाऱ्या आजीला बाजारात जायला तरी कुठे वेळ असतो ! रोज हात भाजतात तिचे ! हमीदची दोस्तमंडळी पुढे गेली आहेत.

हमीदनं दुकानदाराला विचारलं, ''चिमटा कितीला दिला ?''

दुकानदारानं पाहिलं, की या पोराबरोबर कुणी मोठं नाहीये, तेव्हा तो म्हणाला, ''हे तुझ्या कामाचं नाही.''



‘‘विक्रीसाठी नाहीय का ?’’

‘‘विक्रीसाठी का नाही ? इथवर बोजा आणला असता का ?’’

‘‘मग सांगत का नाही किंमत काय पडेल ती?’’

‘‘सहा पैसे लागतील.’’

हमीद थोडा थबकला. ‘‘बरोबर भाव सांगा.’’ तो म्हणाला.

‘‘योग्य भाव ? पाच पैसे लागतील. घ्यायचं असेल तर घे नाहीतर चालू लाग.’’

‘‘तीन पैशांना देणार का ?’’ हमीद थोडा धाडसानं म्हणाला आणि पुढे निघाला. त्याला वाटलं दुकानदार त्याला धुडकावून लावेल; पण दुकानदारानं त्याला बोलवून तीन पैशांत चिमटा दिला.

मुलांनी यात्रेत खूप मजा केली. खेळणी घेतली, मिठाई खाल्ली. हमीदनं मात्र स्वतःवर खूप ताबा ठेवला होता. त्याला आजीला खूश करायचं होतं. तो चिमटा घेऊन घरी परतला.



अमीनाआजी हमीदचा आवाज ऐकून लगेच बाहेर आली. त्याला कडेवर उचलून लाड करू लागली, एवढ्यात त्याच्या हातात चिमटा दिसला.

‘‘हा चिमटा कुठून आणलास ?’’

‘‘मी विकत आणलाय.’’

‘‘किती पैशांत ?’’

‘‘तीन पैसे दिले.’’

अमीनाबी एकदम दुःखी झाली. ‘कसं पोरगं आहे. दुपार झालीय. न काही खाल्लं न प्याला. आणलंय काय तर चिमटा !’

‘‘एवढ्या साऱ्या मेळ्यात तुला आणखी काही मिळालं नाही ? तू चिमटा उचलून आणलास तो !’’

हमीद अपराधी भावनेनं म्हणाला, ‘‘तुझे हात स्वयंपाक करताना भाजतात न म्हणून आणलाय मी चिमटा !’’

अमीनाआजीचा राग गायब झाला. ‘दुसऱ्या पोरांनी मिठाई, खेळणी घेतलेली पाहून या पोरालाही वाटलं असेल घ्यावं. त्याचं मन किती लालचावलं असेल. एवढा त्यानं मनावर ताबा मिळवला कसा ? तिथे पण त्याला ह्या म्हाताऱ्या आजीची काळजी होती.’ तिचं मन भरून आलं.

तिला रडू कोसळलं. पदर पसरून ती हमीदला आशीर्वाद देत होती. तिच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू गळत होते... आणि हमीद आजीच्या प्रेमळ कुशीत शिरला होता.

**मूळ लेखक – प्रेमचंद**

**अनुवाद – संजीवनी खेर**

**शब्दार्थ :** **ईदगाह –** प्रार्थनास्थळ. **रोजा –** सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत केलेला उपवास.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) गावात कशाची गडबड चालली होती ?

(आ) मुलांचा आनंद का उतू चालला होता ?

(इ) हमीदच्या घरी कोणकोण होते ?

(ई) नमाज संपल्यावर लोक काय करतात ?

(उ) अमीनाने दिलेल्या पैशाचे हमीदने काय घेतले ?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) ईदच्या दिवशीची सकाळ कशी आहे ?

(आ) ईदच्या दिवशी मुलांचा आनंद कसा आहे ?

(इ) हमीद कोणत्या आनंदात होता ?

(ई) ईदची प्रार्थना कशी चालते, त्याचे वर्णन करा.

(उ) ईदगाहजवळच्या मेळ्यात हमीदच्या मित्रांनी काय काय मौज केली ?

(ऊ) चिमट्याचे काय काय उपयोग होतात ?

(ए) हमीदने आणलेला चिमटा पाहून अमीनाआजीला काय वाटले ?

**प्र. ३. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) जणू तो साऱ्या जगाला ............. शुभेच्छा देत आहे.

(आ) हमीदचे अब्बा मागच्यावर्षी ............... बळी गेले.

(इ) हमीदच्या खिशात ............... पैसे आहेत.

(ई) दुकानदाराने आधी चिमट्याची किंमत ............... पैसे सांगितली.

**प्र. ४. शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) आनंद उतू जाणे.

(आ) धुडकावून लावणे.

(इ) मन लालचावणे.

(ई) मनावर ताबा मिळवणे.

**प्र. ५. हमीदच्या घरी ईद साजरी केली जाते. तुमच्या घरी कोणते सण साजरे करतात ? त्यांतील कोणता सण तुम्हांला जास्त आवडतो ? तो कसा साजरा करतात ते आठ ते दहा ओळींत लिहा.**

## आम्ही सहलीला जातो

- **वाचा. समजून घ्या.**



गेला रविवार आम्ही अगदी मजेत घालवला. जेवणाचे डबे घेऊन सकाळी अगदी लवकर आम्ही शाळेत जमलो. आम्ही बसनं निघालो. बुलढाण्याहून दोन तासांत आम्ही लोणार तालुक्याला पोचलो.

लोणारला पोचल्यावर तिथल्या जगप्रसिद्‌ध सरोवराला जाण्याआधी आम्ही नाष्टा केला. लोणार सरोवराला आम्ही जाणार, हे कळल्यापासून वर्गात एकच चर्चा होती. आम्ही त्याविषयी घरच्यांना, शेजाऱ्यांना माहिती विचारत होतो.

सरोवराजवळ येताच आम्ही भराभर बसमधून बाहेर पडलो. तिथली माहिती सांगणारे गाइड आमची वाटच पाहत होते.

ते म्हणाले, ''मुलांनो, हजारो वर्षांपूर्वी उल्कापातामुळे हे सरोवर तयार झालंय. हे खाऱ्या पाण्याचं सरोवर आहे. आश्चर्य म्हणजे, एवढ्या खाऱ्या पाण्याच्या सरोवराभोवतालच्या विहिरींचं पाणी गोड आहे. अशा प्रकारचं हे भारतातलं एकमेव सरोवर आहे.''

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना वरील चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. परिसरात अशा सहलींचे आयोजन करून विद्यार्थ्यांना त्यांचे अनुभव लिहायला सांगावे.

सरोवराभोवती सुंदर हिरवळ होती. करड्या रंगाचा काठ आणि त्यात हिरव्या-निळ्या रंगांचं पाणी अगदी मोहक दिसत होतं. सरोवर एवढं मोठ्ठं होतं, की बाईंनी दुर्बीण आणली नसती, तर पलीकडची झाडं, पक्षी आम्हांला दिसले नसते. आम्ही खाऊ-फळं आणली होती; परंतु आम्ही तिथे कचरा टाकला नाही. आजूबाजूचा परिसरही आम्ही स्वच्छ केला. बाईंनी आम्हांला शाबासकी दिली. आम्ही तिथे बराच वेळ खेळून परत निघालो.

बसमध्ये आम्ही निसर्गाच्या किमयेची चर्चा करत होतो.

**उपक्रम :** बुलढाणा जिल्ह्यातल्या एका शाळेतली मुले लोणार सरोवराला सहलीला गेली होती. त्यांनी केलेले सहलीचे वर्णन काळजीपूर्वक वाचा. तुमच्या परिसरातील निसर्गरम्य ठिकाणी सहलीला जा. तुम्ही भेट दिलेल्या ठिकाणाचे वर्णन दहा ते बारा ओळींत लिहा.

- **वाचा. उत्तर सांगा.**

एक प्राणी आहे असा
पायाविना चालतो कसा ?

रंग त्याचा असा तसा
लांब शेपटी, आहे छोटासा.

हालता हालता दावी गंमत
पडद्यावरती बघा करामत.

इशारा मिळताच पडद्यावर
खूण जाते खाली-वर.

खात नाही, पीत नाही
आवाज त्याचा होत नाही.

वीज गेली म्हणजे मात्र
थंड पडते याचे गात्र.

**– वि. ह. क्षीरसागर**

(**उत्तर** : संगणकाचा माउस.)

# १०. धाडसी हाली



पुरस्कारासह हाली बरफ

तुम्हांला कशाची भीती वाटते ? कोणी म्हणेल, 'झुरळांची.' कोणी म्हणेल, 'छट्, झुरळाला काय घाबरायचं ? आपण जवळ गेलो तरी ते पळून जातं.' कोणी म्हणेल, 'मला अंधाराची भीती वाटते.' त्यावर कोणी म्हणेल, 'अंधाराची भीती? त्यात काय असतं घाबरण्यासारखं ? दिवा लावला की अंधार गायब !' पण समजा तुम्हांला कोणी विचारलं, की 'तुमच्यासमोर एखादा वाघ किंवा बिबट्या उभा आहे, तर तुम्हांला काय वाटेल ?' 'छे! वाघाला काय घाबरायचं ?' असं म्हणायची हिंमत कोणी करेल ? नाही ना ? पण आपण अशा एका मुलीला भेटणार आहोत जी वाघाला घाबरून पळाली नाही. उलट तिने वाघापासून तिच्या बहिणीला वाचवले. हाली बरफ ही ती धाडसी मुलगी. या धाडसाबद्‌दल नवी दिल्ली येथे मा. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सन २०१३ मध्ये 'वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार' देऊन तिचा गौरव करण्यात आला.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात तानसा धरण आहे. या धरणाच्या परिसरात अभयारण्य आहे. तेथे विविध प्रकारचे जंगली प्राणी आहेत. या भागात वेगवेगळ्या पाड्यांवर आदिवासी राहतात. त्यांचे जीवन जंगलावर अवलंबून आहे. त्यामुळे जंगलात त्यांचा सतत आणि सहज वावर असतो. जंगलाची, तिथल्या प्राण्यांची त्यांना खडान्‌खडा माहिती असते. ते निर्भय असतात. जंगल ही आपली संपत्ती आहे. तिचे संवर्धन कसे करावे हे आदिवासी जाणतात.

तानसा धरणाच्या परिसरातील आटगावजवळ नांदगावच्या जमनाचा पाडा आहे. तेथे हाली बरफ ही मुलगी आपल्या कुटुंबासोबत राहत होती. निसर्गाच्या सहवासात लहानाची मोठी झालेली पाणीदार डोळ्यांची, सावळ्या रंगाची, काटक हाली बरफ ही वारली या आदिवासी समाजाची आहे. हालीचे वडील रघुनाथ हे रेल्वेत कामाला होते. एका अपघातात त्यांचा एक हात निकामी झाला. घरच्या गरिबीशी झुंज देणाऱ्या हालीने नेमके कोणते धाडस दाखवले ? चला, आपण तिच्याकडूनच ऐकूया. हालीची घेतलेली ही मुलाखत काळजीपूर्वक समजावून घ्या.

**प्रश्न** : तू जंगलात कशासाठी गेली होतीस ? तुझ्यासोबत कोण होतं ?

**हाली** : लाकरा आनाला गेलतू, माझे सोबत माझी मोठी बहीण (शकुंतला) होती. पाठीमागशी बहिणीवर वाघानं हाल्ला केला. तिचं पाठीचा लचका तोरला. मांडी आनी पायाचा लचका कारला. बहीण जखमी झाली.

प्रश्न : तुझ्या बहिणीवर हल्ला केल्यावर तू काय केलंस ?

हाली : मी आधी घाबर-घाबरशी झालू. मग दगडं आपटली. लांब-लांबची लोकं आरडावरडा केलंवर धावत आली. मी जोरात मोठी-मोठी दगडं आपटली. वाघाला दगडं लागली. मंग वाघ पलून गेला.

प्रश्न : लोकांनी काय मदत केली ?

हाली : मी आरडावरडा केला. तवा काही लोक लाकरा गोला करीत होती. ती पन धावत आली.

प्रश्न : ही गोष्ट बाकीच्या लोकांना कशी समजली ?



हाली : गावच्या लोकांनी सांगला.

प्रश्न : तुझ्या जखमी बहिणीला कुठे नेलं ?

हाली : पयल्यांदा शहापूरचे दवाखानत नेली.
मंग ठान्याचे सिविल हासपिटला नेली.

प्रश्न : तुझी बहीण वाचली का ?

हाली : बहीण वाचली.

प्रश्न : बहीण वाचली याबद्दल तुला काय वाटतं ?

हाली : आमाला बरा वाटला.

प्रश्न : तू बहिणीला वाचवलंस. त्यानंतर तुला कोणीकोणी मदत केली ?

हाली : आमचा मामा पांडु किरकिरे यानी लई मदत केली. गावचे लोक, शहापूरचे लोक यांनी सुदिक मदत केली. गावाचे शिक्षकांनी सुदिक मदत केली.

प्रश्न : तुझं पेपरात नाव आलं, बातमी छापून आली, तेव्हा तुला कसं वाटलं ?

हाली : चांगला वाटला.

प्रश्न : तू बहिणीला वाचवलंस, त्यामुळे तुला राष्ट्रीय शौर्य पुरस्कार मिळाला. तुला दिल्लीला येण्याचं आमंत्रण मिळालं. तू कोणासोबत दिल्लीला गेली होतीस ?

हाली : दिल्लीला माझे सोबत माझी आई, माझा मामा होता.

प्रश्न : दिल्लीला गेल्यावर तुला कसं वाटलं ? तेथील अनुभव सांग.

हाली : दिल्लीला गेलंवर चांगला वाटला. तिथं माझेसारखी दुसरी पन पोरा व्हती. काही पोरांची हत्तीवरशी मिरवणूक काढली. मी मोटारीशी फिरलू. चांगला खायाला मिलाला. खेलाला मिलाला. पंधरा दिस दिल्लीत व्हतू.

प्रश्न : तुला कोणाच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला ?

हाली : मला प्रधानमंत्र्यांनी पुरस्कार दिला.



**प्रश्न** : तू किती शिकलीस ?

**हाली** : मी शाळेन गेलू नाय. आमची गरिबी. कुटुंब मोठा, म्हनून शालेन गेलू नाय.

**प्रश्न** : तुझ्या धाडसाची घटना वाचणाऱ्या मुलामुलींना तू काय सांगशील ?

**हाली** : घाबरले नाय पायजे. लोकांना वाचवले पायजे.

**प्रश्न** : एवढा मोठा पुरस्कार तुला मिळाला. सगळ्यांनी तुझं कौतुक केलं. मग तुला काय वाटलं?

**हाली** : मला चांगला वाटला. पन मला काम मिलाला असता, त जास्ती चांगला वाटला असता.

**प्रश्न** : सध्या तू काय करत आहेस ?

**हाली** : मी लग्न करून रातांधळे पाड्याला राहती. दिवसभर मोलमजुरी करती.

हालीचे आभार मानून आम्ही निघालो, तेव्हा तिचं धाडस, तिची परिस्थिती यांचाच विचार आमच्या मनात होता.

(या पाठ्यपुस्तकासाठी ही मुलाखत मराठी कार्यगट सदस्य प्रा. जयवंत पाटील यांनी घेतली आहे.)

**शब्दार्थ :** **अभयारण्य** – प्राणी किंवा पक्ष्यांसाठी राखून ठेवलेला जंगलाचा भाग. **लाकरा** – लाकडे, लाकूडफाटा. **आनाला** – आणायला. **गेलतू** – गेले होते. **पाठीमागशी** – पाठीमागून. **हाल्ला** – हल्ला. **लचका** – शरीराचा तोडलेला मांसल भाग. **तोरला** – तोडला. **आनी** – आणि. **कारला** – काढला. **घाबर–घाबरशी** – घाबरी. **झालू** – झाले. **दगडं आपटली** – दगडं मारली. **आरडावरडा** – आरडाओरडा. **केलंवर** – केल्यावर. **मंग** – मग. **पलून** – पळून. **गोला** – गोळा. **सांगला** – सांगितले. **पयल्यांदा** – पहिल्यांदा. **सिविल हासपिट** – सिव्हिल हॉस्पिटल, सरकारी इस्पितळ. **आमाला** – आम्हांला. **लई** – खूप. **सुदिक** – सुद्धा. **गेलंवर** – गेल्यावर. **पन** – पण. **दुसरी पोरा** – इतर मुलं. **फिरलू** – फिरले. **खायाला** – खाण्यासाठी. **खेलाला** – खेळण्यासाठी. **मिलाला** – मिळाले. **दिस** – दिवस. **व्हतू** – होते. **शालेन** – शाळेत. **गेलू** – गेले. **नाय** – नाही.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) हालीला कोणता पुरस्कार मिळाला ?

(आ) हाली लाकडे गोळा करायला कुठे गेली होती ?

(इ) हालीच्या बहिणीवर कोणी हल्ला केला ?

(ई) हालीला दिल्लीला जाण्यासाठी कोणी मदत केली ?

(उ) हालीने कोणता संदेश दिला ?

प्र. २. हालीने दाखवलेल्या धाडसाचे वर्णन करा.

प्र. ३. हालीला 'वीर बापूराव गायधनी' हा राष्ट्रीय शौर्य पुरस्कार का मिळाला ?

**उपक्रम :** राष्ट्रीय शौर्य पुरस्कार मिळालेल्या धाडसी मुलांची माहिती मिळवा. वाचा. वर्गात सांगा.



**चला, वाचूया.**

## वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार

नाशिकमधील बापू गायधनी यांनी भीषण आगीतून लहान मुलांना आणि जनावरांना वाचवले. त्यासाठी त्यांनी स्वतःचा प्राण गमावला. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या त्यांच्या या अतुलनीय शौर्याच्या स्मरणार्थ, स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवणाऱ्या शूर मुलामुलींना 'वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय शौर्य पुरस्कार' दिला जातो. दरवर्षी असे जास्तीत जास्त तीन पुरस्कार दिले जाऊ शकतात.

'राष्ट्रीय बालकल्याण परिषदेच्या' वतीने दिले जाणारे हे शौर्य पुरस्कार स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांच्या शिफारशीने दिले जातात. रोख रक्कम, पदक आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असते. कोणत्याही वर्षी ३० सप्टेंबरपर्यंत पुरस्कारासाठी नावे पाठवावी लागतात.

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. पुरस्कार मिळवणाऱ्या मुलांना प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात गौरवाने सहभागी करून घेतले जाते.

पुरस्कारप्राप्त मुलामुलींना गरज असल्यास त्यांच्या पुढील शिक्षणासाठी, तसेच व्यावसायिक उच्च शिक्षणासाठी परिषदेच्या वतीने मदत केली जाते. त्यासाठी या धाडसी मुलांची शिफारस जिल्हाधिकाऱ्यांमार्फत परिषदेकडे केली जाते.





वीर बापूराव गायधनी यांच्या शौर्याची काल्पनिक चित्रे

# ११. नाखवादादा, नाखवादादा...

• ऐका. म्हणा. वाचा.

नाखवादादा, नाखवादादा,
'खाडीपल्याड न्याल काय ?'
'खाडीपल्याड या वेळी,
सोन्या तुझे काम काय ?' ।। १ ।।

खाडीपल्याड उंच डोंगर,
डोंगरावर हिरवे रान,
सकाळच्या कोवळ्या उनात,
दिसेल किती छान छान ! ।। २ ।।

हिरव्या रानी शुभ्र ससे,
सशांचे डोळे लाल लाल.
त्यांना पाहून रागाने,
गुंजा आपले फुगवतील गाल. ।। ३ ।।

फुलाफुलांत फुलपाखरे,
फुलपाखरांचे सोनेरी रंग.
उनात त्यांच्यासंगे न्हाती
पक्षी आपले फुलवून अंग. ।। ४ ।।

पानापानांत दवबिंदू,
दवबिंदूंचे हिरे लाख.
कोवळ्या उनात झगमगती,
आभाळाचे निळे पाख. ।। ५ ।।

आभाळात रंगीत ढग,
ढगांमागे इंद्रकमान.
कमानीवर घेऊन झोके,
पाहयची आहे खाडीची शान. ।। ६ ।।

नाखवादादा, नाखवादादा,
'खाडीपल्याड न्याल काय ?'
'सोनसळ्या कवडशा,
न नेऊन चालेल काय ?' ।। ७ ।।

नाखवादादा, नाखवादादा,
खाडीपल्याड नेण्यासाठी काय घ्याल ?
काही नको सोन्या मला,
पापीसाठी गुबरे गाल ! ।। ८ ।।

– वसुधा पाटील



**शब्दार्थ :** **नाखवादादा** – तांडेल, नावाडी. **खाडीपल्याड** – खाडीच्या पलीकडे. **शुभ्र** – पांढरे. **गुंज** – लाल-काळ्या रंगाची बी. **पाख** – पंख. **कवडसा** – छोट्या जागेतून येणारा सूर्यप्रकाश.

## स्वाध्याय

### प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) या कवितेत कोण कोणाशी बोलत आहे ?

(आ) कवितेतील मुलाला नाखवादादा कोणत्या नावाने हाक मारतो ?

(इ) हिरव्या रानात कोण आहे ?

(ई) पानापानांत कोण लपले आहे ?

(उ) मुलाला कशावर झोके घ्यायचे आहेत ?

(ऊ) नाखवादादा शेवटी मुलाला काय म्हणतो ?

### प्र. २. जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) सशाचे डोळे | (अ) सोनेरी रंग |
| (२) फुलपाखरांचे | (आ) लाख हिरे |
| (३) दवबिंदूंचे | (इ) लाल लाल |

### प्र. ३. खालील ओळी वाचून चित्र काढा.

(अ) फुलाफुलांत फुलपाखरे
फुलपाखरांचे सोनेरी रंग.

(आ) ढगांमागे इंद्रकमान.
कमानीवर घेऊन झोके,
पाहायची आहे खाडीची शान.

### प्र. ४. तुम्ही काय कराल, ते सांगा.

(अ) नदीकाठावर उभे राहून.

(आ) उन्हात गेल्यावर.

(इ) पावसात भिजल्यावर.

(ई) बागेतील फुले पाहिल्यावर.

(उ) आकाशातले चांदणे पाहताना.

(ऊ) थंडीने गारठून गेल्यावर.

**उपक्रम :**

१. रंगीबेरंगी फुलपाखरांची चित्रे काढा.
२. फुलपाखरांच्या कवितांचा संग्रह करा.
३. वेगवेगळ्या प्रकारच्या होड्या बनवा.
४. एखाद्या वाहनचालकाची भेट घ्या. त्याच्या कामाची माहिती घ्या. वाहनचालकाला त्याचे काम करताना आलेले अनुभव वर्गात सांगा.

## आम्ही खेळ खेळतो













**शिक्षकांसाठी :** वरील खेळ कसे खेळतात याविषयी वर्गात चर्चा करावी. असे खेळ शाळेत घ्यावे. विद्यार्थ्यांना 'तुम्ही यांसारखे कोणकोणते खेळ खेळता', हे विचारावे.

# १२. वाटाड्या

"काका, काका..." आवाज आला. कोणीतरी त्याला हालवत होतं. स्पर्श कोवळा, नाजूक होता. हाताची बोटंही इवलीशी.

"काका, काकाऽऽ" त्या छोट्या मुलीने त्यांना पुन्हा हाक मारली. तसा तो पटकन तिच्या बाजूला वळला. ती म्हणाली –

"काका, मला किनई खूप भीती वाटते."

"कशाची भीती?" काकांनी विचारले.

"मला रस्त्याची भीती वाटते." मुलगी म्हणाली.

"रस्ता काय वाघ-सिंह आहे – खाऊन टाकायला ?" काका म्हणाले.

"वाघसिंह नाही हो – पण केवढी रहदारी असते रस्त्यावर ! मोटारी, स्कूटर, मधेच शिट्टी वाजवणारा पोलीस. कोणी कुठूनही भर्रकन येतं. मघा तर मी त्या सायकलच्या चाकातच जात होते."

"अरेरे !... पण असं रस्त्याला घाबरून कसं चालेल ? बाहेर तर जावंच लागतं ना?"



"हो ना काका. बाहेर जाताना आई, बाबा असतातच बहुतेक माझ्याबरोबर, तेव्हा मला नाही भीती वाटत रस्त्यांची ! आई किंवा बाबांचं बोट धरलं की भीती गायब. अगदी ऐटीत चालते मी त्यांच्याबरोबर." मुलगी म्हणाली.